Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

January-2023

(CCCLXXXVI ) 386 (A)

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Vilas Aghav**
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Dist. Bhandara

| | | |
|---|---|---|
| 20 | भारतीय लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका डॉ. संतोष कोल्हे | 87 |
| 21 | मानवी हक्क आणि भारतीय संविधान प्रा. डॉ. कविता सोनकांबळे | 90 |
| 22 | भारतीय राजकारणाचे स्वरूप आणि विकास प्रा. रमेश एकनाथ भारुडकर | 96 |
| 23 | केंद्र - राज्य संबंध आणि सरकारिया आयोग डॉ. संजय गायकवाड | 99 |
| 24 | शिक्षण आणि मानवाधिकार सहसंबंध - एक चिकित्सा डॉ. आशिष गट्टाणी | 102 |
| 25 | भारतीय लोकशाहीचे बलस्थाने डॉ.दत्ताजी हुलप्पा मेहत्रे | 106 |
| 26 | भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वाटचालीत समाजमाध्यमांची बदलती भूमिका श्री रामप्रसाद मोहनराव व्हडगीर | 109 |
| 27 | मानवाधिकार: भारतीय संविधान का मूलाधार डॉ. प्रीति शर्मा - भट्ट | 113 |
| 28 | भारतीय केंद्र-राज्य संबंधाची तनावाकडे वाटचाल- कारणे आणि उपाय प्रा.चंद्रकांत एन. पुरी , डॉ.संजय गायकवाड | 115 |
| 29 | भारतात सार्वत्रिक निवडणूकीत मतदार वर्तनाला प्रभावित करणारे महत्वाचे घटक प्रा.पी.एम.ठाकरे | 120 |
| 30 | मानव-अधिकार आणि संयुक्त राष्ट्र संघ डॉ. सतीश खरात | 124 |
| 31 | भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क किशोर कैलास बांबर्डे , प्रा.डॉ.आघाव एन.बी. | 129 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवाद अन्नपुर्णा राजु कुरील | 133 |
| 33 | आजादी का अमृत महोत्सव और स्त्री सशक्तीकरण प्रो.किरण दुबे | 138 |
| 34 | मानवी हक्क आणि भारतीय संविधान प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर | 141 |
| 35 | भारतीय राजकारणातील प्रमुख प्रश्न डॉ.प्रकाश सुदामराव लोखंडे | 145 |
| 36 | न्यायाधीशांची नियुक्ती: न्यायालयीन स्वातंत्र्याचा एक महत्त्वाचा मुद्दा विश्वंभर धर्मा गायकवाड | 148 |
| 37 | मानवाधिकार आणि महिलांचे शोषण डॉ. आकाश शेषराव बांगर | 153 |
| 38 | भारतीय संविधानातील नागरीकत्व तरतुदीचा अभ्यास प्रा.डॉ.माधव एस.वाघमारे | 156 |
| 39 | भारतीय संसदीय लोकशाही : राम मनोहर लोहिया चे विचार एक योगदान प्रा. दिपक अशोक खिल्लारे | 159 |
| 40 | ग्रामीण विकासात पंचायतराजची भुमिका शिवाजी विजयराव अवचार | 163 |
| 41 | डॉ. वि. भि. कोलते यांच्या 'अजूनि चालतोचि वाट' हया आत्मचरित्रातील शैक्षणिक चिंतन डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 166 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- A
ISSN : 2278-9308
January, 2023

# डॉ. वि. भि. कोलते यांच्या 'अजूनि चालतोचि वाट' हया आत्मचरित्रातील शैक्षणिक चिंतन

डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा.
भ्रमणध्वनी :– ९७६४९०५२२२

❖ प्रस्तावना :–

'अजूनि चालतेचि वाट' हया डॉ. वि. भि. कोलते हयांच्या आत्मचरित्रात शालेय शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत तसेच प्राध्यापकापासून नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु पदापर्यंतच्या संघर्षाची कहाणी आहे. ग्रामीण जीवनातील सामाजिक जीवन तसेच नागरी जीवनातील जातीव्यवस्था उलगडून दाखविणारेअनेक पैलू या आत्मचरित्रात पाहायला मिळतात. प्रशासकिय पदावर असताना आलेल्या अनुभवाची यथार्थ मांडणी निर्भिडपणे त्यांनी येथे अधोरेखीत केली आहे. महानुभाव वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, संशोधक म्हणून त्यांची ख्याती आहे. कवी, नाटककार, उत्कृष्ट वक्ते, मर्मज्ञ संशोधक आणि भाष्यकार अशी विविध बिरुदावली त्यांच्या नावासमोर लावता येईल ; एवढेत्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. प्रस्तुत आत्मचरित्र हे शिक्षण क्षेत्रातला आरसा वाटावा असे आहे. लेवा/कुणबी जातीत लेखकाचा जन्म झाला असला तरी सामाजिक विषमतेचे दाहक चटके त्यांना बसले. त्याचे निर्भिडपणे अधोरेखन त्यांनी केले आहे. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्माला येऊनही आपल्या कर्तृवाने त्यांनी साहित्य, संशोधन कार्यात आणि शैक्षणिक कार्यात अतिशय मोलाची भर घातली आहे. आई–वडिलांच्या कष्टाळू स्वभावाचे त्यांच्यावर लहाणपणापासूनच संस्कार झाले. महात्मा गांधीच्या अहसकार आंदोलनाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. देशप्रेमाची विलक्षण धुंदी लहानपणापासूनच त्यांच्यात चढली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हिंदुत्ववादी विचारधारेचा त्यांच्यावर प्रभाव पडला नाही. ते गांधीवादी होते, त्यामुळेच कदाचित त्यांच्या वैयक्तिक जीवनात संघर्ष आला. दलित, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती अशा समुदायांना जोडणारी विचारधारा त्यांना अभिप्रेत होती. महानुभाव पंथाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांनी प्रत्यक्ष सामाजिक कार्य करताना महानुभाव पंथियासोबत चळवळ केल्याचे दिसून येते. मराठीवर त्यांचे नितांत प्रेम होते. मराठी विषयीचे त्यांनी अनेकदा भाषीक प्रश्न उपस्थित करुन मराठीच्या पाठीशी ते वेळोवेळी ठामपणे उभे राहिले. हे प्रकर्षाने जाणवते.

❖ 'अजूनि चालतोचि वाट' स्वरुप व आशय :–

डॉ. वि. भि. कोलते यांना जातीभेद आणि अंधश्रध्दा अजिबात मान्य नाहीत. जी जातीव्यवस्था त्यांनी खेडयात पहिली तशीच जातीव्यवस्था त्यांनी शहरात आणि शैक्षणिक वर्तूळात पाहिली. डॉ. कोलत्यांचे वाङ्मयीन जीवन समृध्द आणि प्रगल्भ आहे. विद्यार्थीदशेपासूनच त्यांची वाङ्मयीननिष्ठा उत्स्फूर्तपणे त्यांच्या व्यक्तिमत्वातून विकसित होत गेली. त्यांच्या एकूणच वाङ्मयीन आणि शैक्षणिक कर्तृत्वामूळे अमरावती विद्यापिठाने त्यांना डी. लिट. ही पदवी देऊन सन्मानीत केले. प्रस्तुत आत्मचरित्राचे निवेदन त्यांनी प्रमाण मराठी भाषेतून केले आहे. आईच्या संदर्भातील संवाद ग्रामीण बोलीतून घालून कथानकात त्यांनी जिवंतपणा आणला. त्यामुळे कथानकाला गती प्राप्त झाली. त्यातून रसिकांना वास्तवतेची जाणीव होऊन त्यांचे रंजनही करता आले. शैलीदार आणि लालित्यपूर्ण भाषेचा वापर हेही त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्टये सांगता येतील. त्यांनी निवेदनात प्रमाण भाषेचा जास्त वापरकेला असला तरी प्रसंगानुरुप बरेचसे ग्रामीण शब्द लेखनात घातले आहेत. ते साहित्यिक असल्यामुळे आपल्या अनुभवांना कलात्मक पातळीवर त्यांनी रेखाटले आहे. त्यांची वाक्य रचना लयबध्द आणि सुटसुटीत आहे. त्यांच्या शब्दात अर्थवाहकता आहे. प्रासादिकतेमुळे त्यांच्या लेखनाला माधुर्याचा आणि सौंदर्यवेधकतेचा स्पर्श होतो. त्यांच्यातील कलात्मकतेचा, कलात्मक तटस्थतेचा आणि प्रतिभाक्षमतेचा वाचकास प्रत्यय आल्याशिवाय रहत नाही. निवेदन करताना ते संस्कृत श्लोकाचा, कवितेचा वापर करुन निवेदनाला भक्कमपणा प्राप्त करुन देतात. अखिल भारतीय स्तरावरील मराठी साहित्यात आपल्या विशिष्ट लेखनशैलीमुळे त्यांनीआपले महत्वपूर्ण स्थान सिध्द केले आहे. या आत्मचरित्रातून त्यांची शैलीवैशिष्टये, वाङ्मयीन गुणवत्ता आणि व्यक्तिमत्वातील मर्मस्थळे प्रामुख्याने दिसून येते.

❖ 'अजूनि चालतोचि वाट' मधिल शैक्षणिक चिंतन :–

'अजूनि चालतोचि वाट' हे डॉ. वि. भि. कोलते यांचे आत्मचरित्र असून शैक्षणिक जीवनासाठी अनेकांना प्रेरीत करणारे असे हे आत्मचरित्र आहे. प्रतिकुल परिस्थितीतून बिकट वाट काढीत शैक्षणिक क्षेत्रात डॉ. वि. भि. कोलत्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. शैक्षणिक प्रगतीच्या वाटेत जे राजकिय खाचखळगे आणि जातीय विषमता आडवी आली ती ओलांडून कोलत्यांनी स्वत:चे व्यक्तिमत्व सिध्द केले.

Off. Principal
Late. N...

महाविद्यालयीन अध्ययन आणि अध्यापनाचे कार्य चालू असतांनाच 'नागपूर विद्यापीठ' आणि 'माध्यमिक शाळा शिक्षण मंडळ' यांच्याशी कोलत्यांचा संबंध आला. ज्ञानाचे क्षेत्र कितीही पवित्र मानण्यात येत असले ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थातील वातावरण स्वार्थ, मत्सर इत्यादी भावनांनी कसे दूषित झाले आहे याचा प्रत्यय कोलत्यांना असंख्य वेळा आला. १९३४ मध्ये माध्यमिक शिक्षण मंडळाकडूनघेतल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षेच्या मराठी विषयाच्या उत्तर पत्रिका तपासण्यासाठी कोलत्यांना परिक्षक म्हणून नेमल्या गेले होते. मराठी विषयाचे पेपर्स ते अत्यंत बारकाईने तपासायचे. हातात लाल पेन्सील घेऊन प्रत्येक चुकीवर खूण करण्याची त्यांना सवय होती. उत्तर तपासून झाल्यावर त्यातील आशय व हया सर्व चुका लक्षात घेऊन नंतर ते गुणांकन करायचे. विद्यार्थ्यांनी त्या पेपर्समध्ये ज्या चुका केल्या त्या सर्व त्यांनी 'उत्तर पत्रकातील मौजा' हा लेख 'किर्लोस्कर' मासिकातलिहिला. मनोरंजनासोबतच विद्यार्थ्यांना त्यातून बोध व्हावा हा त्यांचा हेतू होता. मात्र ऑक्टोबर १९३७ च्या त्या अंकातील लेखामुळे शिक्षण विभागाच्या कार्यालयातून शिक्षण संचालकांनी त्यांना पत्र लिहून परिक्षेचा गोपणीय प्रकार उघड केल्याबद्दल कोलत्यांचेकान टोचले. आणि पुढील अनेक वर्षे त्यांना परिक्षकाचे काम मिळाले नाही. शिक्षण व्यवस्थेतील दुरावस्था लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतांना प्रकरणच स्वतःच्या अंगावर उलटल्याचे बऱ्याचश्या घटना कोलत्यांच्या आयुष्यात घडल्या. शिक्षण क्षेत्रात मूलभूत बदल घडावेत ही त्यांची मनिषा होती. त्यासाठी त्यांची धडपड होती मात्र ही त्यांची एकांगी धडपड फारसे कुणी समजु शकले नाहीत.हिंदी भाषा आणि हिंदी भाषिकयांच्या विषयी आकस बाळगून मराठी भाषीकांच्या बाबतीत ते पश्चाताप करतात.असे त्यांच्यावर विद्यार्थ्यांनी आणि हिंदी भाषिक प्राध्यापकांनी आरोप लावलेत. महाविद्यालयात प्राचार्य या नात्याने काम करतांना आणि पुढे प्रशासकिय, शासकिय,निमशासकिय संघटनात काम करतांना हिंदी–मराठी वाद अधुनमधून उफाळून येत असत.

डॉ. वि. भि. कोलते कुलगुरु झाल्यानंतर विद्यापिठीय परिक्षांच्या काही भानगडी उद्भवल्यात. त्या त्यांनी पध्दतशीर सोडविण्याचा प्रयत्न केला, कुलगुरु झाल्यानंतर शिक्षणाचे दुसरे सत्र सुरू करण्याचा त्यांनी विचार केला. विद्यापिठाकडून दरवर्षी पुरवणी परिक्षा घेतल्या. मार्च महिन्यात होणाऱ्या मुख्य परिक्षात जे अनुत्तीर्ण होत त्यांना या परिक्षांना बसता येत असे. असे विद्यार्थी या पुरवणी परिक्षेत उत्तीर्ण झाले तर पुढील वर्षात प्रवेश घेऊन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्यांना पुढील जुलैपर्यंत वाट पहावी लागत असे, म्हणे जवळ जवळ सात महिने त्यांना काही न करता नुसते रिकामे रावे लागे. म्हणूनच दूसरे शैक्षणिक सत्र सुरू करण्याचा त्यांनी विचार केला.तो विचार त्यांनी कार्यकारी परिषदेसमोर मांडला. परिषदेने त्याला मान्यता दिली. शिक्षण मंत्र्यांना ही कल्पना आवडली म्हणून त्यांनी शासकिय नागपूर महाविद्यालय आणि विज्ञान महाविद्यालयांना हा प्रयोग करून पाहण्याला सांगितले. उन्हाळयाच्या सुट्टीत जे अध्यापक या दुसऱ्या सत्रात काम करतील त्यांना अतिरिक्त मानधन देण्याचेही त्यांनी मान्य केले. त्याप्रमाणे डिसेंबर आणि ऑक्टोंबर पर्यंत असे हे दुसरे शैक्षणिक सत्र दोन्ही

महाविद्यायात सुरू करण्यात आले. तथापी सुट्टीत काम करण्यासाठी अध्यापकांचा योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळेहा प्रयोग बंद करावा लागला. सुट्टयांच्या बाबतीतही त्यांनी प्रयोग करून पाहण्याचा प्रयत्न केला परंतू तोही फसला. २६ जानेवारी आणि १५ ऑगष्ट हया दोनच सुट्टया सर्वांना द्यायच्या. त्या वगळून, एरवी राजपत्रित झालेल्या सुट्टयांच्या ऐवजी तितक्याच संख्येच्या सुट्टया प्रत्येकाने आपआपल्या सोयीनुसार घ्यायच्या. यामुळे सुट्टयांच्या बाबतीत राष्ट्रीय दृष्टीकोनाला महत्व मिळणार होते. परंतू हे दोन्ही प्रयोग कोलत्यांचे फसले. विद्यापिठात व शासकिय महाविद्यालयात त्यांचे शैक्षणि धोरण त्यांना अमलात आणता आले नाही. प्राध्यापकांच्या काम करण्याच्या धोरणबाबत कोलत्यांच्या मनात नाराजी होती. ते म्हणतात, "........ रात्रीचा वेळ वगळून १२ तासांचा एक दिवस म्हटला तर प्राध्यापक केवळ ४५–४६ दिवस काम करतातआणि वेतन मात्र १ वर्षाचे घेतात". "खेडयापाडयात रात्रंदिवस काम करणाऱ्या शेतकरी कामकरी यांच्या तुलनेने इतके कमी दिवस काम करून भरपूर वेतन घेणारे हे प्राध्यापक जनतेचे एका दृष्टीने शोषणच करित नाही काय? म्हणून मला नेहमीच असे वाटते की, प्राध्यापकांनी वर्गात अध्यापनाचे काम प्रामानिकपणे करून राहिलेला वेळ आपल्या अध्ययनात, स्वतंत्र संशोधनात, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात घालविला पाहिजे, ते त्यांचे परम कर्तव्य होय." शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करतांना डॉ. कोलत्यांनी जे धोरण स्विकारण्याचा प्रयत्न केला ते प्रयत्न चुकीचे ठरविण्याचा प्रयत्न काही विघ्नसंतोषी मंडळींनी केला. संशोधन जसे स्वतःचे तसे विभागातर्फेही करण्यात यावे अशी त्यांची अपेक्षा होती. विशेषतः अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विषयात सर्वांनी मिळून एखादा समाजोपयोगी प्रकल्प हाती घेऊन त्यासंबंधी संशोधन करणे सामाजिक बांधिलकिच्या दृष्टीने आवश्यक होते परंतु कोलत्यांच्या दृष्टीकोनाला प्राध्यापकांनी बगल देण्याचाच प्रयत्न केला. विद्यापिठ अनुदान मंडळही संशोधनाला महत्व देत असे. त्यासाठी आर्थिक साहाय्य देत असे. संशोधन करून पीएच. डी.मिळविणाऱ्या प्राध्यापकांना दोन वेतनवाढी देण्याची सोय विद्यापिठाने केली होती पण याचा उपयोग प्राध्यापक घेत नाही अशी कोलत्यांनी अनेकदा नाराजी व्यक्त केली होती. ते म्हणतात, "माझ्या शैक्षणिक

जिवनक्रमात 'विद्यार्थी हाच माझ्या कार्याचा मी प्रमुख केंद्रबिंदू ठेवला होता. विद्यार्थी आहेत म्हणून महाविद्यालये आहेत, महाविद्यालये आहेत म्हणून प्राध्यापक आहेत, म्हणून विद्यापिठ आहे. अर्थात, विद्यापिठ विद्यार्थासाठी असते आणि त्याच दृष्टीने प्राध्यापकांनी व विद्यापिठाने आपल्याला विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सर्वस्वाने वाहून घेतले पाहीजे, असे मला वाटत होते''. अशी डॉ. कोलत्यांची तळमळ होती परंतू त्यांची ही व्ययक्तिक तळमळकुणी फारशी समजून घेतली नाही. शिक्षण क्षेत्रात मुलगामी संशोधन व्हावे ही त्यांची ईच्छा अपूर्ण आणि अर्धवट राहिली असे म्हणायला हरकत नाही.

❖ 'अजूनि चालतोची वाट' चे वाड्:मयीन वैशिष्टये आणि मुल्यमापन :–

भाषा हे संप्रेषणाचेमाध्यम आहे.प्रत्येक लेखकाचे एक स्वतेत्र व्यक्तिमत्व असते. अनुभव आणि तो अनुभव अभिव्यक्त करण्याची प्रत्येकाची एक शैली असते. भाषेच्याच माध्यमातून लेखक आपल्या भावना व्यक्त करत असतो. ती त्याची शैली असते. प्रसिध्द पाश्चिमात्य लेखक ब्युफा म्हणायचे, 'Style is the man'शैलीम्हणजेच मनुष्यत्व. आई या विषयावर अनेकांनी कविता लिहिल्या. माधव ज्युलियन, ग्रेस, पद्मा गोळे, वामन निंबाळकर, फ. मु. शिंदे यांनी ज्या कविता 'आई' या विषयावर लिहिल्या त्यातील अनुभव समृध्दता आणि आशय अभिव्यक्तींची प्रत्येकाची स्वतंत्र शैली आहे. डॉ. वि. भि. कोलते हे प्रशासनात राहून साहित्यात उंच भरारी घेणारे लेखक आहेत. सामाजिक, राष्ट्रीय चळवळीत प्रत्यक्ष काम करून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झालेले आहे. त्यांच्या साहित्यातून त्यांच्यावरील संस्कार प्रकट होतांना दिसतो.

आत्मचरित्र लिहितांना डॉ. कोलत्यांनी प्रमाण भाषेतून निवेदन लेखन केले तर आईच्या संदर्भातील संवाद ग्रामीण बोलीतील घातले त्यामुळे कथानकाला जिवंतपणा येऊन गतीशिलता प्राप्त होते. त्यातून रसिकांना वास्तवतेची जाणीव होऊन त्यांचे रंजनही होत जाते. शैलीदार आणि लालित्यपूर्ण भाषेचा वापर हेही त्यांच्या आत्मचरित्राचे वैशिष्टये म्हणता येईल. बुलढाणा जिल्हयातील, मलकापूर तालुक्यातील नरवेल या छोटयाशा गावातील भौगोलिक परिसर, तेथिल आजूबाजूचे समाजजीवन आदी साऱ्याच गोष्टींचे पडसाद त्यांच्या आत्मचरित्रात पहायला मिळतात. एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबीयांची जीवनशैली, त्यांची बोली, ग्राम्यता त्यांची संस्कृती हया सर्व गोष्टी भाषेच्या माध्यमातून प्रकट होतांना दिसतात. लेखक ज्या जीवन क्षेत्रातील, जीवनस्तरावरील अनुभव प्रकट करित असतो त्या क्षेत्रातील आणि स्तरातील भाषा किंवा बोली अवतरणे स्वाभाविक असते. 'अजूनि चालतोचि वाट' मध्ये याचा प्रत्यय येतो. प्रमाणभाषेचा वापर डॉ. कोलत्यांनी भरपूर प्रमाणात आपल्या आत्मचरित्रात केला. अधुनमधून काही बोलीतील शब्दांचाही प्रसंगानुरूप वापर करणे स्वाभाविक होते. काही ग्रामीण शब्द त्यांनी वापरलेले आहेत. जसे 'नवरा–नवरीचा पेंड' (पृ. ३), 'पेव' (पृ. ३), 'मुलाची ज्वारी' (पृ. ४), 'सोळवी' (पृ. १५) हजामत (पृ. १५), 'कापड–चोपड' (पृ. ३२) 'पळी, कडची, सराटा, उल्हा' (पृ. ४०) अश्या बऱ्याच शब्दामुळे त्यांच्या लेखनात लालित्य आणि प्रासादिकता निर्माण होते. आईच्या आणि मोठया बहिणीच्या तोंडातून अशी बरिचशी ग्रामीण वाक्यरचना ऐकायला मिळते. त्यांचे वडील मात्र प्रमाण मराठीतूनच संवाद साधतांना दिसतात. एकदा डॉ. कोलत्यांनी वडीलांना न सांगता त्यांचे घडयाळ शाळेत नेले होते. त्यावेळी बाबांनी दुकानातील घडी शाळेत पाठवून घडयाळ मागवून घेतले होते. आई त्यांच्यावर रागावली होती. तो संवाद मोठा मार्मीक होता. डॉ. कोलते लिहितात, '' शाळा सुटल्यावर घरी गेलो तेव्हा आई माझ्यावर पुष्कळ रागावली. ''आत्तापासून चोरी कऱ्याले शिकला काय?'' असे म्हणून तिने माझा कान पिळला. मी म्हटले, ''आई, मी चोरी नाही केली. बाबांच्या कोटाला असलेली घडयाळ पाहून मला गंमत वाटली, म्हणून मी ते काढून शाळेतील मुलांना दाखवायला घेऊन गेलो. मी चोरी केली नाही. ''........ आई म्हणाली, ''असं इचारल्याशिवाय माक्यान नेऊ नये. इचारल्याशिवाय नेनं यालेच चोरी म्हणतात. आताहे आल्यावर तुले खूप मारतीन'' डॉ. कोलते हे बालपणीच असहकार चळवळीच्या प्रभावात आले होते. एक दिवस ते घर सोडून ते पुण्याला निघून गेले. तेथे एका पोलिसाने त्यांना आसरा दिलाआणि घरी जाण्याचा सल्ला दिला. ते वापस घरी आले तेव्हा वडीलांनी 'शाळेत जाणार आहेय कि नाही?'असे विचारले तेव्हाही त्यांनी नाहीच म्हटले वडीलांना राग आला त्यांना एक फोक घेतला आणि त्यांना चांगलाच चोप दिला. त्यांच्या पाठीवर वळ उठले होते. आई त्यांना समजवतांना म्हणाली, ''इस्नू बेटा, शाळेत जाय नं, घरी राहून तू काय करशीन? असाच मार खाशीन काय? ते तुले घरात राहू देणार नाहीत, मंग काय करशीन? माहा ऐक शायीत जाय'' अशी ग्राम्यता असणारी फार थोडी वाक्ये प्रस्तुत आत्मचरित्रातून पाहायला मिळतात. डॉ. कोलते नागपूर विद्यापिठाचे कुलगुरू झाल्यानंतर त्यांचे जागोजागी सत्कार झाले. तांदूळवाडीला त्यांची बहीन गोदुबाई राहायची. तिच्या गावी तिने सत्कार समारंभ आयोजित केला होता परंतू वेळ न मिळाल्यामूळे ऐन वेळेवर त्यांनी तांदुळवाडीला जाणे टाळून मलकापूरला जाणे योग्य समजले. दुसऱ्या दिवशी त्यांची बहीन त्यांच्या भेटीला गेली आणि म्हणाली, ''भाऊ, काल्दी तांदुलवाडीले सर्व्याइनी तुमची किती वाट पाहयली. पण तुम्ही आले नाही मी तं रस्त्याकडे डोये लावूनच बसली होती, अन् सर्व्याइले सांगत होतो की, माझा भाऊ आल्यावाचून राहणार नाही. पण तुम्ही आले नाही. म्हले काय वाटलं कसं सांगू? रातभर मो लळत



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

होती. 'माहा इस्नूभाऊ मले इसरला की काय बाप्पा!' असं मनात येऊन मले अखीनच लव्ळू येत असे'. अशा बोलीच्या संवादातून त्यांनी आपली ग्रामीण ओळख आणि संस्कृती कायम ठेवली आहे. आपल्या ओघवत्या आणि रसाळ भाषेतून डॉ. कोलत्यांनी आपले लेखन केले. निवेदन करतांना ते म्हणी, कविता, संस्कृत श्लोक आणि काव्यात्मक वाक्यरचनांचा वापर करतात. ज्या विषयावर ते माहीती देत असतात त्या विषयाशी संबंधित एखादा संस्कृत श्लोक तिथे वापरतात. त्यामुळे निवेदनाला भक्कमपणा प्राप्त होतो. उदा. 'पीडयन्ते गृहिण: कथं नु तनयाविश्लेवदुखैर्नवे:' (पृ. ५५१), त्व जीवितं त्वमसि मे हृदय द्वितीय। त्वं कौमुदी नयमनोरमृतं त्वंदने।।' (पृ. ६८९)

डॉ. कोलते साहित्यिक असल्यामुळे आपल्या अनुभवांना जास्तीत जास्त कलात्मकता आणण्याचे ते काम करतांना दिसतात. प्रासादिकता आणण्याचे काम ते करतांना दिसतात. त्यांच्याजवळ भाषासामर्थ्य आहे. याचा प्रत्यय येतो. त्यांच्या भाषासामर्थ्यामुळे विशेष परिणामकारकता त्यांच्या लेखलातून जाणवते. त्यांची वाक्यरचना लयबध्द आणि सुटसुटीत आहे. त्यांच्या शब्दात अर्थवाहकता आहे. लेखनातील माधुर्य हे त्यांच्या लेखनशैलीचे खास वैशिष्टये आहे. त्यांच्या लेखनात पाल्हाळीकपणा दिसून येत नाही.स्पष्टपणे आणि रोखठोकपणे ते कथन करताना दिसतात. मनात काही न ठेवता मनातले शब्दात मांडण्याची त्यांची निर्भिडवृत्ती आत्मचरित्राला वास्ववतेचे स्वरूप बहाल करतांना दिसते. त्यातील वास्तवमुळेच वाचकांच्या नजरेसमोर हुबेहुब शब्दचित्र उभे करण्याचे कसब त्यांच्या लेखनशैलीत आहे. त्यांच्या एकूणच लेखनशैलीत सुटसुटीतपणा, प्रवाहित्तव, रसपूर्णता, लालित्यता, आज इत्यादी गुण पहायला मिळतात. जे उत्तम संशोधक जरी असले तरी आपल्या भाषेला बोजड स्वरूप येऊ न देता ललित शैलीचा वापर करून वाचकांना खिळवून ठेवतात. त्यांच्यातील कलात्मकतेचा, कलात्मक, तटस्थतेचा, आणि प्रतिभाक्षमतेचा वाचकांस सतत प्रत्यय येतांना दिसतो.

❖ निष्कर्ष :–

- मराठी भाषा आणि मराठी प्रदेशाविषयी अट्टाहास करुन विद्यापिठीय प्रशासकीय क्षेत्रातील भाषिक तथा इतर राजकारण उजागर करणारे प्रस्तुत आत्मचरित्र आहे.
- प्रस्तुत आत्मचरित्रातून डॉ. वि. भि. कोलत्यांच्या निर्भिड, व्यासंगी, अभ्यासू, संशोधक तथा महानुभावीय साहित्याचे पुरसकर्ते अशा बहूआयामी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते.
- कवी, नाटककार, उत्कृष्ट वक्ते, मर्मज्ञ संशोधक आणि भाष्यकार म्हणून डॉ. वि. भि. कोलते यांचे जीवन प्रस्तुत आत्मचरित्रातून प्रकट होते. हे आत्मचरित्र शिक्षण क्षेत्रातला आरसा वाटावा असे आहे.
- प्रस्तुत आत्मचरित्रातील निवेदन हे प्रमाण मराठीतून असले तरी आपल्या लालित्यपूर्ण शैलीतून नरवेल आणि आजूबाजूच्या ग्रामीण परिसरातील बोलीभाषेचा समूचित वापर केला आहे.
- डॉ. कोलत्यांवर बालपणापासून महात्मा गांधींच्या कार्याचा विलक्षण प्रभाव पडला असल्याचे जाणवते.
- मराठी भाषेच्या व्याकरणाचा, साहित्यशास्त्राचा आणि भाषाशास्त्राचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. त्यांची वाक्यरचना लालित्यपूर्ण, सुटसुटीत आणि प्रवाही स्वरुपाची असल्यामुळे रसिकांना खिळवून ठेवण्याची त्यांची शैली नावीन्यपूर्ण अशी आहे.
- जात, धर्म, पंथांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय एकात्मतेची विलक्षण तळमळ असणारा एक कर्मठ प्रशासक, कुटुंबवत्सल माणूस म्हणूल डॉ. कोलते यांचे व्यक्तिमत्व प्रस्तुत आत्मचरित्रातून प्रकट होताना दिसते.
- 'अर्थवाहकता' या त्यांच्या लेखनातील गुणवैशिष्ट्यांमुळे विशेष परिणामकारकता त्यांच्या आत्मचरित्राला लाभल्याचे दिसून येते.
- महानुभावीय साहित्याचे गाढे अभ्यासक आणि पुरोगामी चळवळीचे भाष्यकार म्हणून अखिल भारतीय स्तरावर डॉ. कोलत्यांचे विशेष असे स्थान आहे.

❖ संदर्भ ग्रंथ सूची :–

१) डॉ. वि. भि. कोलते – 'अजूनि चालातोचि वाट', नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर मार्च १९९४

२) डॉ. आनंद यादव– 'आत्मचरित्रमीमांसा', मेहता पब्लिकेशन, पुणे, फेब्रु. १९९८

३)डॉ. गो. म. कुळकर्णी – 'नवसमीक्षा आणि विचारप्रवाह', मेहता पब्लिकेशन, पुणे, १९८२